# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे प्रल्हाद गेंदुजी तेलगोटे यांनी दाखल केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात असल्यामुळे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 2.4.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1438-1442

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 600/2007.**

श्री सुनिल पंडीतराव जगताप
रा. टाईप 55/53/12, औष्णिक विज केंद्र वसाहत
कोराडी, पो. कोराडी कॉलनी, ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
व्यवस्थापकिय संचालक,
महाराष्ट्र विज निर्मिती कंपनी मर्या.
प्रकाशगढ, बांद्रा (पुर्व) मुबई ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.9.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 2.11.207, 3.11.2007 व 25.3.2007 रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता अर्जदार हे सुनावणीस पुढील तारीख मिळण्याकरीता अर्ज सादर केला होता व नंतरच्या तारखांना सुध्दा ते गैरहजर राहिले व आजही स्वतः न येता प्रतिनिधीस पाठविले आहे. उत्तरवादी माहिती अधिकारी कु. भारती एच. भाटीया हया प्रत्येक तारखेस हजर आहेत. व आजही हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.9.2006 रोजी अजय मेहता व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र विज निर्मिती कंपनी मर्या. प्रकाशगढ, बांद्रा (पुर्व) मुबई यांचेकडे माहिती मागण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अर्ज केलेला दिसून येतो. सदरच्या अर्जामध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

संदर्भ : 1) दि. 16.5.2005 ते दि. 25.3.2006 पर्यंत केलेले साखळी पध्दतीने व आमरण उपोषण.

2) उपोषणबाबत पाठविलेले पत्रक दि. 17.7.2006

3) मा. कक्ष अधिकारी उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्रक क्र. संकीर्ण–6/प्र.क्र.92/उर्जा 4 दि. 7.1.2006

4) माझे विनंती अर्ज क्रमवार 1) दि. 25.1.2006 2) दि. 4.2.2006 3) दि. 6.2.2006

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मी खाली सही करणात अर्ज सादर करतो की मी औ. विज केंद्र कोराडी येथे अर्ध कुशल कारागीच (चतुर्थ श्रेणी) म्हणून कार्यरत होतो. मला औ. विज मंडळातून मा. उपमुख्य अभियंता यांच्या दि. 21.3.2001 च्या आदेशा प्रमाणे दि. 22.3.2001 पासुन बेकायदेशिररित्या बडतर्फ करण्यात आले. मला कुठल्याही विभागीय चौकशीत बोलावून बचावाची संधी दिली नाही. आपल्या औ. विज मंडळाच्या कर्मचारी सेवानियमाला औद्योगिक विवाद अधिनियम लागु करुन घेतले नव्हते या अधिनियमा अंतर्गत पुर्व परवानगी न घेता मला बडतर्फ करण्यात आले. तसे मा. उपमुख्य अभियंता अशा उच्च पदस्थ कर्मचा–यांनी मला बडतर्फ केल्यामुळे मला मंडळाच्या कर्मचारी सेवानियमात दिल्याप्रमाणे प्रथम व द्वितीय अपील प्राधिकारी उरले नव्हते या बाबद न्यायालयात जाण्यापूर्वी त्यावेळी असलेले मा. उपमुख्य अभियंता औ. विज केंद्र कोराडी यांच्याशी कायदेशिर चर्चा केली परंतु यांनी माझे काही एक म्हणणे ऐकले नाही व विनंती फेटाळून लावली. कर्मचारी सेवानियमात दिल्याप्रमाणे प्रथम व द्वितीय अपील प्राधिकारी उरले नव्हते करीता मला मा. प्रथम कामगार न्यायालयात

तक्रार क्र. 199/01 दाखल करुन प्रथम कामावर रुजू करुन घेण्या संबंधी इंटरिम रिलिफ मागीतला या प्रमाणे मा. प्रथम कामगार न्यायालय यांनी कुठलाही भेदभाव न करता निष्पक्ष निर्णय माझ्या पक्षाने दिला. हा निर्णय मंडळाच्या कर्मचारी सेवानियमात दिलेल्या नियमानुसार दिल्यामुळे मला प्रथम कामावर रुजू करुन घ्यायला पाहिजे होते. असे न करता संबंधित कार्यालयाद्वारे इतर न्यायालयाची दिशाभूल करुन मंडळाच्या पक्षाने निर्णय लावून घेतला व सेवानियमाची पायमल्ली केली. तसेच मला बडतर्फ केल्यानंतर औद्योगिक विवाद अधिनियम 1947 च्या अंतर्गत मला कामावरुन कमी करित असलेल्या कार्यवाहीस परवानगी मिळण्याबाबद संबंधित विज केंद्राच्या मा. उपमुख्य अभियंता यांनी कामागार आयुक्त कॉमर्स सेंटर ताडदेव मुंबई यांना अर्ज पाठविला हे कृत्य बेकायदेशिर नाही काय ?

संबंधित कार्यालयाद्वारे माझ्या प्रति वेळोवेळी आपले मुख्य कार्यालय प्रकाशगढ, बांद्रा (पुर्व) मुबई व इतर कार्यालयात युकीची, दिशाभूल करणारी व अन्यायकारी धोरणात्मक माहीती पाठवून माझ्यावर अन्यायावर अन्याय केल्या गेला व केल्या जात आहे.

उपरोक्त संदर्भिय क्र. 1 चे उपोषण सुरु करण्यापूर्वी व उपोषण सरु असतांना वेळोवेळी मुख्य कार्यालय प्रकाशगढ, बांद्रा (पुर्व) मुबई व इतर कार्यालयांना माझ्यावर होत असलेल्या अन्यायाबाबद कळविले. उपरोक्त संदर्भिय क्र. 1 चे उपोषण सुरु असतांना मला मा. कक्ष अधिकारी यांचे उपरोक्त संदर्भिय क्र. 3 चे पत्रक प्राप्त झाले. या पत्रकात लिहील्याप्रमाणे मी मला पुर्ववत कामावर रुजू करुन घेण्या संबंधी न्याय मिळावा म्हणून सर्व माहीतीसह उपरोक्त संदर्भिय क्र. 4 चे क्रमवार अर्ज पाठवून विनंती केली. परंतु मला आपल्याद्वारे कुठलेही पत्रक प्राप्त झाले नाही व न्याय मिळाला नाही तसेच वि. सिडी. द्वारे सुध्दा माझ्यावर झालेला अन्याय कळविला परंतु मला न्याय मिळवून देण्यात आला नाही व संबंधित कार्यालयाद्वारे न्यायालयात प्रकरण पंलंबित असल्याचे

सांगुन मा. प्रथम कामगार यांनी दिलेल्या इंदरिम रिलिफ आदेश लपविण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. तोच मा. सहा. कामगार आयूक्त कॉमर्स सेंटर ताडदेव मुंबई यांची सुध्दा दिशाभूल करुन यांच्याद्वारे बेकायदेशिररित्या दिशाभूल करुन मंडळाच्या पक्षाने निर्णय लावून औद्योगिक विवाद अधिनियमाची सुध्दा अवमानना व पायमल्ली केली हे स्पष्ट होते.

मला पुर्ववत कामावर रुजू करुन घेण्याकरीता नाईलाजास्तव परत आपणास व संबंधीत कार्यालयाला उपोषणाचे पत्रक देवून उपरोक्त संदर्भिय क्र. 1 च्या पत्रकात लिहील्याप्रमाणे दि. 2.8.2006 उपोषण सुरु केले आहे. या उपोषणाच्या पत्रकात सुध्दा माझ्यावर झालेला अन्यायाची माहीती सविस्तर लिहीली आहे.

करिता मी आपणास नम्र विनंती करतो की मा. प्रथम कामगार यांनी माझ्या पक्षाने दिलेल्या इंदरिम रिलिफ आदेशाची अवमानना का करण्यात आली ? जेव्हा की हा आदेश मंडळाच्या कर्मचारी सेवाविनियमा प्रमाणे दिला आहे.

औ. विज मंडळाच्या कर्मचारी सेवानियमाला औद्योगिक विवाद अधिनियम लागु करुन घेतले नसतांना औद्योगिक विवाद अधिनियम माझ्यावर केलेली बडतर्फीची कार्यवाही बेकायदेशीर नाही काय ?

करीता मी आपणास नम्र विनंती करतो की उपरोक्त संदर्भिय क्र. 2 च्या उपोषणाबाबद पाठविलेल्या दि. 17.7.2006 च्या पत्रकाचे सविस्तर अवलोकन करुन माझ्यावरच अन्याय का केला जात आहे व यावर आपण कोणता निर्णय धेतला आहे. कृप्या याची माहीती हे पत्रक आपल्या कार्यालयात प्राप्त झाल्याच्या तारखेपासून दहा दिवसाचे आत शिघ्रपोष्ट द्वारे कळवावे जेणे करुन मला योगय न्याय मिळेल.

मा. महोदय आपण निष्पक्ष कुठलाही भेदभाव न करता आपण सविस्तर माहीती कळवाल हि अपेक्षा. अर्जावर दहा रु. कोर्ट फी लावली आहे.

सदरच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अर्ज केलेला नाही. अपीलकर्ता हा अर्ध कुशल कारागीर (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी आहे असे अर्जात म्हटले आहे व त्यामुळे त्यांनी त्यांच्या बडतर्फीच्याबाबत मागितलेली माहिती ही जरी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नसली तरी ही निश्चितच व्यवस्थापकिय संचालक हे जन माहिती अधिकारी नसतांना त्यांचेकडे मागणे अपेक्षित नाही. व तसा खुलासा महानिर्मिती कडून प्रथम अपीलीय व जन माहिती अधिकारी यांना तपशिल दि. 30.10.2007 रोजी आयोगाकडे देण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांनी प्रामुख्याने त्यांच्या बडतर्फीच्या संदर्भामध्ये अन्याय झालेला असल्यामुळे कारणे विचारलेली आहेत. व उपोषणाबाबत पाठविलेल्या दि. 17.7.2006 च्या पत्राचे सविस्तर अवलोकन करुन माझ्यावरच अन्याय का केला जात आहे व यावर आपण कोणता निर्णय घेतला आहे अशी विचारणा केलेली दिसून येते. त्यानंतर जी कागदपत्रे त्यांनी दाखल केलेली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या द्वितीय अपीलाच्या संदर्भात अनावश्यक आहे. त्यानंतर सुध्दा राज्य माहिती आयोगाकडे दि. 1.11.2007 रोजी त्यांनी जो खुलासा दाखल केलेला आहे त्या खुलाशामध्ये दि. 28.9.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले असे दिसते. व त्यानंतरही त्यांनी बराच पत्रव्यवहार महाव्यवस्थापक यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून केलेला दिसून येतो. वास्तविक ''माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहितीच्या अधिकारामध्ये मागण्याचा समावेश नसावा'' असे 25.9.2006 रोजी विहित मुदतीत मुख्य महाव्यवस्थापक यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते तरीही अपीलकर्ता हे माहितीच्या अधिकारामध्ये पत्रव्यवहार करीतच राहिले आहेत असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. सदरच्या व्याख्येमध्ये ''माहिती'' याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज, परिपत्रके व इतर

कागदपत्रे उपलब्ध असतील यांचा समावेश होतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या 5. 9.2006 च्या अर्जामध्ये ज्या पध्दतीने माहिती मागण्याचा जो प्रयत्न केलेला आहे तो अधिनियमाप्रमाणे अपेक्षित नाही. मुख्य महाव्यवस्थापक यांनी वेळोवेळी अपीलकर्ता यांना उत्तरे पाठविलेली आहेत तसेच एक उत्तर दि. 26.10.2007 रोजी सुध्दा देण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या संदर्भात न्यायालयीन प्रकरणे सुध्दा झालेली दिसून येतात व त्या न्यायालयीन प्रकरणाच्या प्रती सुध्दा काहीही कारण नसतांना राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या दिसून येतात. आजही खालीलप्रमाणे खुलासा पाठविलेला आहे.

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रान्वये कळवू इच्छितो की मला औ. विज केंद्र कोराडी येथे मा. प्रथम कामगार न्यायालय नागपूर यांनी दिलेल्या इंटरिम रिलीफ आदेशाप्रमाणे प्रथम कामावर रुजू करुन घेण्यासंबंधी महामहीम राष्ट्रपतिजींना पाठविलेल्या विनंती अर्जात दिल्या प्रमाणे अद्याप उपोषण सुरु आहे. करिता मी संदर्भीय पत्र क. 988/08 दि. 18.3.2008 अन्वये कळविल्याप्रमाणे दि. 3.4.2008 रोजी सुनावणी करिता आपल्या कार्यालयात हजर राहू शकत नाही.

करीता मा. महोदय माझे मित्र श्रीमान कृष्णा भगत यांच्या सोबत सुनावणीच्या संबंधित प्रकरणावर केलेल्या पत्रव्यवहाराच्या खालील लिहीलेल्या मूळ प्रति पाठवित आहो. आपणास आवश्यक वाटल्यास कृपया पडताळून पहावे यांना मी माझा प्रतिनिधी म्हणून अधिकार देत आहे.

1. मा. व्यवस्थापकीय संचालक यांना पाठविलेकला दि. 5.9.2006 चा अर्ज
2. अर्ज प्राप्त झाल्याची पोच पावती, पावती क. ईई 12305764 आय एन
3. मा. मुख्य माहिती आयुक्त यांना पाठविलेला दि. 28.9.2006 चा अर्ज
4. आपले कार्यालयीनम मा. उपसचिव यांचे सुनावणी बाबदचे पत्र क. रामाआ/अपील/2404/07 दि. 6.10.2007

5. सुनावणीची तारीख पुढे घेण्याबाबद दि. 1.11.07 चा माझा अर्ज

6. मा. आस्थापना अधिकारी (मासं 2) व जन माहिती अधिकारी प्रकाशगढ, बांद्रा (पुर्व) मुबई यांनी आपले कार्यालयीन मा. उपसचिव यांना पाठविलेले संबंधित कार्यालयाद्वारे मला प्राप्त झालेले छायांकीत बिना सत्यप्रत क्र. महानिर्मिती/आ.अ.(मासं 2) /आरटीआय/157191 दि. 30.10.2007

7. मा. मुख्य महाव्यवस्थापक (निसवसू) औ. विज केंद्र कोराडी यांनी सादर केलेला तक्रार अर्ज दि. 5.11.2007 या अर्जाची प्रत आपले कार्यालयात व वरील मुख्य कार्यालयाचे मा. माहीती अधिकारी यांना सुध्दा पाठविली व फॅक्सद्वारे सुध्दा कळविले याची प्रत.

8. दिशाभूल करीत असल्याबाबद मा. आस्थापना अधिकारी (मासं 2) व जन माहिती अधिकारी यांना पाठविलेला माझा दि. 5.11.2007 चा अर्ज याची प्रत आपल्या कार्यालयात सुध्दा पाठविली आहे.

9. मा. आस्थापना अधिकारी (मासं 2) व जन माहिती अधिकारी प्रकाशगढ, बांद्रा (पुर्व) मुबई यांचे पत्र क्र. महानिर्मिती/आ.अ.(मासं 2)/16310 दि. 8.11.2007 व यासह प्राप्त झालेले पत्रक.

10. आपले कार्यालयीनम मा. उपसचिव यांचे सुनावणी बाबदचे पत्र क्र. रामाआ/अपील/526/08 दि. 13.2.2008

11. मा. महोदय आपणास पाठविलेला दि. 18.3.2008 चा माझा अर्ज

12. आपले कार्यालयीनम मा. उपसचिव यांचे सुनावणी बाबदचे पत्र क्र. रामाआ/अपील/988/08 दि. 18.3.2008

13. मा. मुख्य व्यवस्थापक (मासं) म.रा.वि.नि.कं.मर्या. प्रकाशगढ बांद्रा (पूर्व) मुंबई यांचे पत्रक क्र. मासं/कामगार/अ/13589 दि. 25.9.2006

14. मा. व्यवस्थापकीय संचालक यांना पाठविलेला माझा अर्ज दि. 21.9.2006

15. मा. मुख्य व्यवस्थापक (मासं) व माहिती अधिकारी म.रा.वि.नि.कं.मर्या. प्रकाशगढ बांद्रा (पूर्व) मुंबई यांचे पत्रक क्र. मासं/माहिती अधिकार 05/सुपज/13554 दि. 25.9.2006

16. मा. व्यवस्थापकीय संचालक यांना पाठविलेला माझा अर्ज दि. 10.10.2006

17. मा. मुख्य सचिव महा. सरकार यांना पाठविलेला माझा अर्ज दि. 16.10.2006

18. मा. व्यवस्थापकीय संचालक यांना पाठविलेला माझा अर्ज दि. 18.10.2006

19. मा. मुख्य सचिवयांना पाठविलेला माझा अर्ज दि. 5.9.2005

20. श्री स. व्य. झणझणे साहेब, कक्ष अधिकारी उद्योग उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. मा.अ./2006/प्रक्र 532/उर्जा 4 दि. 14.9.2006

मा. महोदय वरील क्र. 1 ते 20 पर्यंतच्या पत्रकाचे आपणास आवश्यक वाटल्यास पडताळणी करुन कृप्या निर्णय कळवावा हि नम्र विनंती.

अपीलकर्ता यांनी दि. 5.11.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे याबद्यलची पोच पावती जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेली आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रमाणीत प्रती दिल्या नाही अशी तक्रार केल्यानंतर त्यांना प्रमाणीत प्रती सुध्दा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे तोंडी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 5.9.2006 च्या पत्रामध्ये उपोषणाबाबत दि. 17.7.2006 च्या पत्रान्वये अवलोकन करुन त्यांच्यावर अन्याय का केला जात आहे व त्यावर कोणता निर्णय घेतला आहे याबाबत माहिती मागितलेली आहे. ‘‘दि. 5.9.2006 चा अर्ज या कार्यालयात प्राप्त झालेला नाही. अपीलीय अधिका–याकडे पहिले अपील प्रतिज्ञापत्रासह प्राप्त झालेले नाही. प्रथम अपीलीय अधिका–याच्या आदेशा विरुध्द अपील केले आहे त्या आदेशाची साक्षांकीत प्रत व इतर पत्रव्यवहार जोडलेले नाही. अपीलीय अधिका–याकडे अपील सादर केलेले नाही. दिनांक 17.7.2006 च्या पत्राप्रमाणे मुख्य महाव्यवस्थापक कोराडी यांना अग्रेषित केले होते त्या संबंधी त्यांनी दि. 27.7.2006 रोजी चर्चेकरीता बालाविले होते. व चर्चेचा गोषवारा दिनांक 1.8.2006 रोजी कळविला’’ असा खुलासा जोडलेला

आहे. तसेच सदरची बाब ''मुख्य महाव्यवस्थापक कोराडी यांचे कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात असल्याने त्यांचे कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक राहिल.'' त्याअनुषंगाने मुख्य महाव्यवस्थापक कोराडी यांनी श्री जगताप यांना या प्रकरणी या पूर्वीच माहिती दिलेली आहे असा खुलासा आस्थापना अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेला आहे. व यावरुन अपीलकर्ता यांचे मुख्य तक्रारी त्यांच्या बडतर्फीच्या संदर्भात असल्यामुळे व आजही ते त्याकरीताच उपोषणास बसलेले असल्यामुळे व झालेल्या अन्यायाच्या संदर्भामध्ये त्यांना न्याय मिळवून घ्यावयाचा असल्यामुळे सदरची बाब ही माहितीच्या अधिकाराच्या अंतर्गत येत नाही. राज्य माहिती आयोगास सदरची बाब तपासण्याचा सुध्दा अधिकार नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांचा माहितीचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे नसला तरी त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सर्व त्यांच्या बडतर्फीच्या संदर्भात असल्यामुळे व त्यांनी राष्ट्रपती पासून अनेक अधिका–यांपर्यंत अर्ज केले असल्यामुळे मुदतीची परिगणना करणे हे सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या बडतर्फीच्या संदर्भामध्ये त्यांच्या दि. 5.9.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने कारणे उपलब्ध करुन देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत येत नसल्यामुळे त्यांना दि. 25.9.2006 रोजी त्याबद्यल विहित मुदतीत विचारणा केलेली असल्याने व त्यांना सर्व कागदपत्रे माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्या कागदपत्राच्या आधारे त्यांनी योग्य

त्या न्यायालयाकडे किंवा सक्षम अधिका–याकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल. अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांच्या बडतर्फीबाबतची निर्णय प्रक्रिया राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेर आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 3.4.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.